-: प्रेसनोट दिनांक - ०५/०३/२०२६ :-

**आरोपी लोकसेवक ०१) इरफान दिलावर सनदी , वय - ४१ वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), वर्ग - ३, सजा शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर रा. ८६०/२, शिवाजी कॉलनी लाईन बाजार, कोल्हापूर, जि.कोल्हापूर ०२) दिपक सदाशिव कांबळे, वय - ४३ वर्षे, उपसरपंच शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत..**

---

यातील मुळ तक्रारदार यांचे वडीलांनी शिंगणापूर ता. करवीर येथे खरेदी केले क्षेत्रास खरेदीनंतर तक्रारदार यांचे वडीलांचे नाव सात बारा पत्रकी लावुन देणेकरीता ०१) इरफान दिलावर सनदी , वय - ४१ वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), वर्ग - ३, सजा शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर रा. ८६०/२, शिवाजी कॉलनी लाईन बाजार, कोल्हापूर, जि.कोल्हापूर ०२) दिपक सदाशिव कांबळे, वय - ४३ वर्षे, उपसरपंच शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर यांनी १०,०००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये मुळ तक्रारदार यांचे वडील यांचे नाव ७/१२ पत्रकी नोंद करणेकरीता, तक्रारदार यांना इतर लोकसेवक दिपक कांबळे हे भेटले त्यावेळी त्यांनी त्यांना तलाठी सनदी यांनी नाव नोंदवुन देण्याचे काम करणेकरीता तलाठी सनदी यांचेकरीता व स्वत:करीता बेकायदेशिरपणे १०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ५,०००/- रूपये लाचेची मागणी केली. तसेच कांबळे यांनी मागणी केलेल्या लाच मागणीस तलाठी सनदी यांनी दुजोरा देवुन बेकायदेशिरप पणे लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांच्याकडे मागणी केलेली लाच रक्कम ५,०००/- रूपये इतर लोकसवेक दिपक कांबळे यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक **०१) इरफान दिलावर सनदी , वय - ४१ वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), वर्ग - ३, सजा शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर रा. ८६०/२, शिवाजी कॉलनी लाईन बाजार, कोल्हापूर, जि.कोल्हापूर ०२) दिपक सदाशिव कांबळे, वय - ४३ वर्षे, उपसरपंच शिंगणापूर, ता.करवीर, जि.कोल्हापूर** यांचेविरूध्द करवीर पोलीस ठाणे, इचलकरंजी, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली उजव्ला भडकमकर पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ. संदिप काशीद, पो.ना.सचिन पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील, पो.कॉ.संदिप पवार, चा.स.पो.फौ. गजानन कुराडे ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील क्रमांकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक:- १०६४.